# विभाग पहिला:

# राजकीय भूगोलाचा परिचय

1.1 राजकीय भूगोलाची व्याख्या
1.2 राजकीय भूगोलाचे स्वरूप व व्याप्ती
1.3 राजकीय भूगोलाचा दृष्टीकोन
1.4 राजकीय भूगोलाचे महत्त्व /फायदे

**प्रास्ताविक:**

प्राकृतिक भूगोल व मानवी भूगोल या भूगोलाच्या प्रमुख दोन शाखा आहेत प्राकृतिक भूगोलामध्ये नैसर्गिक घटकाचा अभ्यास केला जातो. मानवी भूगोलामध्ये मानवी घटकांचा अभ्यास केला जातो. **राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची** उपशाखा आहे. आपले जग राजकीय दृष्ट्या विभागलेले आहे. जगाच्या पाठीवर वेगवेगळ्या ठिकाणी राज्य करण्याच्या विविध पद्धती आढळतात. प्रत्येक देशाची राजनिती वेगवेगळी आढळते. या विविध राजनितीवर भौगोलिक परिस्थितीचा काय परिणाम झालेले आहे हे राजकीय भूगोलात अभ्यासले जाते**. रॅटझेल** यांना राजकीय भूगोलाचे जनक म्हटले जाते

## 1.1 राजकीय भूगोलाची व्याख्या: (Definition of Political Geography)

भौगोलिक घटक व राजकारण यांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास राजकीय भूगोलात केला जातो. राजकीय भूगोलाच्या व्याख्या अनेक आहेत त्यातील महत्वाच्या व्याख्या पूढील प्रमाणे

1. राजकीय दृष्ट्या संघटित झालेले प्रदेश, त्यांची साधन सामग्री, विस्तार व त्यांच्या विशिष्ट भौगोलिक स्वरूपाची कारणमीमांसा यांचा अभ्यास म्हणजे राजकीय भूगोल होय - प्राध्यापक पौड्स.

2. राष्ट्राराष्ट्रातील डाव व प्रतिडाव यांवर भौगोलिक परिस्थितीच्या होणाच्या परिणामांचा अभ्यास म्हणजे राजकीय भूगोल होय - व्हॉल्कन बर्ग

3. राजकीय भूगोल म्हणजे राज्यसंस्था व पृथ्वी यांचा परस्पर संबंधाचा अभ्यास होय- कार्लसन

4. राजकीय क्रिया-प्रतिक्रियांचे स्थळांच्या संदर्भात केलेले विश्लेषण म्हणजे राजकीय भूगोल होय - केस्पर्सन व मिंधी

5.राजकीय पद्धतीवर जे स्थलीय घटकांचे परिणाम झालेले असतात त्यांच्या विश्लेषणाचा अभ्यास म्हणजे राजकिय भूगोल होय- कोहेन

6. "मानवाचे वसतिस्थान असलेल्या पृथ्वीवरील इतर घटकांच्या संबंधाने स्थान व स्थानाच्या विविध राजकीय वैशिष्ट्यांचा अभ्यास' म्हणजे राजकिय भूगोल होय- हार्टशोन

7. "राजकीय भूगोल हे राजकीय वैशिष्ट्यांशी संबंधित असलेले, त्याचप्रमाणे संघटनांच्या संरचनेचे अध्ययन करणारे शास्त्र आहे. " - जॅकसन

8. राजकिय क्षेत्राचा अभ्यास म्हणजे राजकिय भूगोल होय - व्हिटलेसी

वरील सर्व व्याख्यावरून असे दिसून येते की,

I) राज्यसंस्था ही राजकीय भूगोलाचील अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे

II) राज्यसंस्था मानवसमूहांनी बनवलेली असून भिन्न - भिन्न मानवसमूह विविध राज्यसंस्थांत राहत असतात.

III) त्यातील मानव समूह वेगवेगळया प्रकारे राजकीय दृष्ट्या संघटित झालेले असतात.

IV) राज्यसंस्थाना क्षेत्रीय घटक असतो.

V) राज्याला स्वतःचे असे व्यक्तिमत्व असते.

VI) राज्य हे सार्वभौम असते

VII) पृथ्वीवरील वेगवेगळ्या प्रदेशात विविध शासनप्रणाली असतात

या सर्व गोष्टींचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास राजकीय भूगोलात केला जातो.

**1.2 राजकीय भूगोलाचे स्वरूप (Nature of Political Geography)**

पर्यावरण, मानवी समाज व राजकीय संघटना गतिशील असल्याने राजकीय भूगोलाचे स्वरूप सतत बदलताना दिसते. त्यामुळेच राजकीय भूगोलाचे स्वरूप गनिमान आहे. राजकीय भूगोलाच्या अभ्यासामध्ये राज्यसंस्थेवर परिणाम करणाऱ्या घटकांना महत्वाचे स्थान असते. यातील काही घटक स्थिर असतात तर काही घटक अस्थिर असतात.

**अ)स्थिर घटक**

यामध्ये पूढील पाच घटक येतान

१. राजसंस्थेचे स्थान
२. भूरचना
३. हवामान
४. मृदा
५. जलाशये

इत्यादी घटकांचा समावेश होतो. परंतु तंत्रज्ञानाच्या विकासामुळे त्यांचे महत्व बदलून राजकीय भूगोलाचे स्वरूप गतिमान होत आहे

**ब. अस्थिर घटक**

यामध्ये पूढील घटकांचा समावेश होतो.

१. लोकसंख्या

२. लोकसंखेचे स्थलांतर व नवीन प्रदेशातील वसाहती
३. खनिज संपत्ती .
४. नवीन देशाची होणारी निर्मिती

"या अस्थिर घटकांमूळे राजकीय भूगोल हे गतिमान शास्त्र बनले आहे. याचा थोडक्यात आढावा पूढील प्रमाणे

**१. लोकसंख्या :**

लोकसंख्येमध्ये होणारी सतत वाढ व घट हा एक राजकीय भूगोलाचा प्रमुख विषय आहे. लोकसंख्या वाढली की पाणीपुरवठा, रोजगार, शिक्षण, आरोग्य अशा अनेक समस्या निर्माण होतात. भारत हा देश तरुण देश म्हणून ओळखला जातो. या देशाने इतर देशामध्ये आपली ओळख निर्माण केली आहे वाढत्या लोकसंख्येला काम नाही दिल्यास नवीन राष्ट्रांची निर्मिती होऊ शकते. उदा → आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, त्रिपूरा, सिक्किम, मिझोराम, मणिपूर यांना संप्तभगिनी म्हणतात यांनी सुद्धा नवीन देशांची मागणी केली होती म्हणून लोकसंख्येमुळे राजकीय भूगोलाचे स्वरूप गतिशील होऊ शकते.

**२. लोकसंखेचे स्थलांतर व नवीन प्रदेशातील वसाहती:**

या राजकीय भूगोलातील महत्वाच्या गोष्टी समजल्या जातात. सुमारे 200 वर्षापूर्वी आफ्रिकेतून निग्रोलोक हजारोंच्या संख्येने अमेरिकेत आणले गेले. त्यातूनच पुढे वंशभेदाचा प्रश्न अमेरिकेत निर्माण झाला. श्रीलंकेतील उत्तर भागात अनेक कुटुंबे भारताच्या दक्षिण भागातून गेली. श्रीलंकेतील समाजात आज त्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. परंतू त्या देशातील इतर समाजाशी ते एकरूप न झाल्याने अनेकदा संघर्ष उद्भवलेले आढळतात. त्यामुळे लोकसंख्येचे स्थलांतर व नवीन प्रदेशातील वसाहतीमुळे राजकीय भूगोलाचे स्वरूप बदलू शकते.

**३. खनिज संपत्ती :**


*प्रा.डॉ. एन.के.बनसोडे, भूगोल विभाग, भोगावती महाविद्यालय,कुरुकली*

खनिजांना शांततेच्या व युद्धंकाळात खूपच महत्व असते. तेलासारखी, यूरेनियमसारखी इंधने निर्माण करणारी खनिजे प्रत्येक राष्ट्रास आवश्यक असतात. अरब राष्ट्रातील खनिज तेलास खूप महत्व आहे यामूळेच भारतात होणारी खनिज तेलाची आयात प्रामुख्याने अरब देशांतून होते. त्यामुळे . अरब राष्ट्राने जरी पाक-भारत संघर्षाच्या वेळी पाकीस्तानला नैतिक पाठिंबा दिला किंवा पाकिस्तानला काही मदत केली तरी देखील अरबांना दुखवणे भारताला झेपणार नाही. तसेच संयुक्त संस्थानातील राज्यात अलास्का येथे खनिज तेल सापडल्याने व सैबेरिया या खंड भागात विविध खनिजांचे साठे सापडल्याने या विभागाचे राजकीय महत्व बदलेले आहे. खनिजसंपत्तीमुळे त्या विभागांना राजकीय महत्व वाढून आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवान बदल घडत आहेत.

**४.नवीन देशाची होणारी निर्मिती**

जगात नवीन देशांची होणारी निर्मीती व भूप्रदेशावरील बदलणारे मालकी हक्क यामूळे राजकीय भूगोल हे गनिमान शास्त्र झालेले आहे. जगाच्या कोणत्याही भागात एखादी राजकीय घटना घडली की तिचे पडसाद जगात सर्वत्र उमटतात तिथे शांतता प्रस्तापित करण्यासाठी रशिया- अमेरिका देश धडपडू लागतात. यापैकी एकाचा पाठिंबा तेथिल बंडखीरास किंवा आक्रमकास असतो तर दूसरा देश तेथिल सरकारच्या मागे असतो. दोन्ही बड़े देश प्रथम सहानूभूती व्यक्त करतात व नंतर लगेच शस्त्रपुरवठा करतात. बड्यांनी आपला हस्तक्षेप थांबवावा म्हणून भारता सारखे तटस्थ देश आवाहन करतात. त्यावेळी मध्यस्थीसाठी व शांतता प्रस्थापित करण्यासाठी रशिया व अमेरिका गटातील देश प्रयत्न करतात, अशा प्रकारे वरील सर्व घडामोडीमुळे (घटकांमूळे) राजकीय भूगोलाचे स्वरूप हे गतिमान बनले आहे

**1.2 राजकीय भूगोलाचे व्याप्ती (Scope of Political Geography)**

राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा आहे. रॅट्झेल याने इ.स. १८९७ मध्ये **पोलीटीश** हा ग्रंथ प्रकाशित केला. पौड्स यांच्या मते राजकीय भूगोल शास्त्र अतिशय व्यापक आहे. **पौड्स** यांनी राजकीय भूगोलाची व्याप्ती विभागणी **सहा** गटात केली आहे.

१. राज्यसंस्था व तेथील मानवी समूह –
२. राज्यांची साधनसंपत्ती
३. राज्यसंस्था व सामाजिक घटक
४. राज्यसंस्थेची सुरक्षा
५. खनिज संपत्ती
६. अमली पदार्थाचा बेकायदेशीर व्यापार

**१.राज्यसंस्था व तेथील मानवी समूह –**

राज्यसंस्था ही राजकीय भूगोलाचील अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे.राज्यसंस्था मानवसमूहांनी बनवलेली असून भिन्न - भिन्न मानवसमूह विविध राज्यसंस्थांत राहत असतात.त्यातील मानव समूह वेगवेगळ्या प्रकारे राजकीय दृष्ट्या संघटित झालेले असतात

**२.राज्यांची साधनसंपत्ती:-**

राज्यसंस्थांना नैसर्गिक साधन संपत्नी कमी-जास्त प्रमाणात प्राप्त झालेली असते. नसलेली संपदा मिळवण्यासाठी सर्वच राज्यसंस्था धडपडत असतात.

**3. राज्यसंस्था व सामाजिक घटक:-**

प्रत्येक राज्यसंस्थेत विविध सामाजिक घटक असतात त्याचे परस्परसंबंध व त्यावर होणारा भौगोलिक परिस्थितीचा परिणाम यांच्या अभ्यासामूळे ही राजकीय भूगोलाची व्याप्ती वाढलेली आढळून येते

**४.राज्यसंस्थेची सुरक्षा:-**

राज्यसंस्थेचा आकार, रचना, भूरचना, लोकसंख्येची घडण, महत्वाकांक्षा या सर्व गोष्टीचा व शेजारी देशांच्या धोरणांचा परिणाम राज्यसंस्थेच्या सुरक्षा व्यवस्थेच्या धोरणावर होत असतो.

**५.खनिज संपत्ती:-**

1960 नंतर किनारवर्ती देश आपल्याला आर्थिक विभागातील खनिजे व इतर सागरजन्य पदार्थ मिळविण्यासाठी धडपडत असल्याने सागरतळाचा भाग आंतरराष्ट्रीय संबंधाच्या दृष्टीने महत्वपूर्ण झालेला आहे. त्यामूळे सागरी क्षेत्ताच्या संदर्भात देशादेशांच्या परस्परसंबधाचे विश्लेषण करणे आवश्यक आहे

**६.अमली पदार्थाचा बेकायदेशीर व्यापार:-**

1970 नंतर अमली पदार्थाचा बेकायदेशीर व्यापार वाढलेला असून त्यापासून मिळणारा पैसा दहशतवादी वापरतात. त्यामुळे आता आमली पदार्थ, त्यांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेले पर्यावरण, पदार्थाची वाहतूक ती करणारी विशिष्ट वर्गातील जनता व त्यांचे परिणाम यांचाही अभ्यास राजकीय भूगोलात केला जाती.

प्रत्येक राज्यसंस्थेत विद्यायक व विध्वंसक शक्ती असतात. त्यांची तीव्रता काळानूसार कमी-अधिक होत असते. या सर्वांचा अंतर्भाव राजकीय भूगोलाच्या व्याप्तीत होतो.

राजकीय भूगोलाची व्याप्ती क्षितिजा सारखी आहे. भूविज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध, समाज शास्त्र व न्यायशास्त्र अशा अनेक विषयांशी राजकीय भूगोलशास्त्र जुमलेले आढळते. राजकीय भूगोलाच्या अभ्यासामुळे आंतरराष्ट्रीय समस्यांचे आकलन होते व त्यांची उकल होण्यासही मदत होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर सामंजस्य निर्माण होण्यास खूपच हातभार लावला जातो. विश्वशांतीच्या निर्मितीसाठी राजकीय भूगोलाच्या अभ्यासाची तर नितांत आवश्यकता आहे.

21 व्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेल्या मानवजातीच्या दृष्टीने विचार करता राजकीय भूगोलाची व्याप्ती पूढील घटकांवर अवलबून आहे.

I. लोकसंख्या नियंत्रण
II. निसर्ग संवर्धन
III. अमली पदार्थावर आधारलेल्या दहशतवादाचे व धार्मिक दहशतवादाचे समूळ निर्मुलन करणे
IV. विश्वशांती

अशा प्रकारे राजकीय भूगोलाच्या व्याप्तीमध्ये राज्यसंस्थेची निर्मिती, त्याच्या सीमा व सीमाप्रदेश, त्याची खनिज संपत्ती, लोकसंख्या, दहशतवाद, राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय संबंध, युध्दे, संघर्ष इ. घटक येतात.

## 1.3 राजकीय भूगोलाचा दृष्टीकोन (Approaches of Political Geography)

कोणत्याही विषयाच्या अध्यापनात सुसूत्रता असण्यासाठी त्यात काही दृष्टिकोन (Approaches) असतात. या दृष्टिकोनांना अभ्यासपद्धती असेही म्हणतात. राजकीय भूगोलाच्या अभ्यासात विविध दृष्टिकोन जुळले आहेत. **हार्टशोन** या शास्त्रज्ञाने राजकीय भूगोलाचे सत्ता (Power), ऐतिहासिक (Historical), स्वरूपशास्त्र (Morphological) व कार्यात्मक (Functional) असे चार दृष्टिकोन मानले आहेत काही तज्ज्ञांनी वरील चार दृष्टिकोनांच्या जोडीला वर्तनात्मक (Behavioral) व रचनात्मक (Systematic) असे आणखी दोन दृष्टिकोन सांगितले आहेत म्हणजेच यात एकूण ६ दृष्टिकोन आहेत.

### १. सत्ता पृथ:करण दृष्टिकोन (The Power Analysis Approach)

राजकीय भूगोलात सत्ताविषयक किंवा शक्ती पृथ:करण दृष्टिकोनाचा उपयोग सामान्यतः बिगर भूगोलशास्त्रज्ञ करतात. भूगोलात सत्ताविषयक दृष्टिकोनाचा संबंध येत नाही; मात्र राजकीय विभाग (क्षेत्र) राजकीय सत्तेच्या अनुरोधाने स्पष्ट केले जातात; म्हणून राजकीय

भूगोलात हा दृष्टिकोन आलेला आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय शक्ती पाच भागांत विभागली जाते यात भौगोलिक, आर्थिक, राजकीय, समाजशास्त्रीय व लष्करी शक्ती अंतर्भूत आहेत राज्य किंवा राज्यसंस्था अथवा देश एक शक्ती (Power) असलेला घटक समजला जातो. यानुसार परस्परसंबंधाचे अध्ययन सत्ताविषयक दृष्टिकोनात होते

**२. ऐतिहासिक दृष्टिकोन )Historical Approach) :**

भूतकालीन चांगल्या गोष्टी आणि वर्तमान समस्या समजून घेण्यासाठी ऐतिहासिक राजकीय भूगोल प्राचीन काळातील बाबींवर प्रकाश टाकतो. **व्हिटलेसी** या शास्त्रज्ञाच्या 'The Earth and state' या ग्रंथात फ्रेंच नॅशनल स्टेटच्या संदर्भात केलेले विवेचन प्राचीन गोष्टीकडे लक्ष वेधणारे आहे. व्हिटलेसी हा फ्रान्स या देशाची राजकीय प्रगती कशी झाली, या दृष्टिकोनातून त्याकडे पाहतो. या संदर्भात राज्याच्या (देशाच्या) प्रगतीचा क्रम प्राकृतिक (Physical) व सांस्कृतिक (Cultural) पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पाहिला पाहिजे. तथापि, सध्या राज्यात (देश) काय आहे? पूर्वी काय होते? हे ऐतिहासिक राजकीय भूगोलाच्या अभ्यासाने स्पष्ट होते. अशा प्रकारे ऐतिहासिक राजकीय भूगोलाचा अभ्यास कोणत्याही सद्य राजकीय घडामोडी वा बाबींच्या बदलाचे व प्रगतीचे स्वरूप पाहण्यास उपयुक्त असतो.

**३. स्वरूप शास्त्रीय दृष्टिकोन )Morphological Approach) :**

या दृष्टिकोनान्वये राजकीय विभागाचा (क्षेत्र) अभ्यास, त्यांचे प्रारूप (Pattern) व रचना (Structure) या दोन वैशिष्ट्यांच्या अनुषंगाने होते प्रारूप हे देश, राज्य वा प्रशासकीय विभागांची मांडणी (Arrangement) दर्शविते, जे स्थान, आकार व आकृती या तीन गोष्टींच्या संदर्भात असते, तर रचना हे लोकसंख्या, आर्थिक विभाग, राजधान्यांची ठिकाणे, सीमा, अविकसित अथवा वादग्रस्त भागाच्या राजकीय घटकांसंबंधीचे वैशिष्ट्य होय. उदा. इटली या देशाचे

प्रारूप हे त्या देशाच्या स्थानाने समजते भूमध्य समुद्राच्या समीपतेमुळे इटलीचे स्थान विशेष महत्वाचे आहे. इटलीची भूराजकीय रचना (Geopolitical Structure) त्याची लोकसंख्या व आर्थिक गाभा क्षेत्र राजधानी व सरहद्दीवरून स्पष्ट होते अशा प्रकारे राजकीय भूगोलाच्या स्वरूपीय दृष्टिकोनाच्या अभ्यासात राज्याच्या सीमा सरहद्दी, सीमा प्रदेश, राज्याचे स्थान, विस्तार, राजधान्या, लोकसंख्या, आर्थिक गाभा क्षेत्र इत्यादी गोष्टी येतात.

**४.कार्यात्मक दृष्टिकोन (Functional Approach)**

कार्यात्मक दृष्टिकोनाची सकल्पना **हार्टशोन** या तज्ज्ञाने मांडली. हा दृष्टिकोन क्षेत्राच्या (प्रदेश) राजकीय घटकाशी संबंधित आहे. प्रत्येक राजकीय भाग हा संघटनेच्या उपभागात विभागला जातो. या प्रत्येक भागाचे शासकीय कार्य असते. या उपभागाचे इतर भागाशी किंवा बाहेरच्या भागापेक्षा देशाशी अधिक मजबूत असे शासकीय संबंध हवेत. तसेच, राज्याचे (देश) कार्य योग्य तऱ्हेने चालण्यासाठी उपभागात ऐक्य पाहिजे. एकसंधता (Unity), सुसूत्रता (सगती) (Coherence), सफल क्षमता (स्थिरता) (Viability) ह्या राज्याच्या ऐक्यासाठी मूलभूत व आवश्यक गोष्टी आहेत सफलक्षमता (स्थिरता) ही गोष्ट केवळ आर्थिक गोष्टीशी सबंधित नाही. तर आर्थिक व राजकीय डावपेच आणि इतर राज्याशी (देश) असलेले राजकीय संबंध यावर अवलंबून आहे या दृष्टीने राज्याचे (देश) हे कार्य महत्त्वाचे असते कार्यात्मक दृष्टिकोनान्वये राज्याचे कार्य नागरिकासाठी आर्थिक सफलक्षमता व स्थिरता निर्माण करणे होय या विशिष्ट कार्यास चालना देण्यासाठी विदेशी व्यापाराचे कायदे, त्या सबंधीचे अनुदान इत्यादी गोष्टींचा राज्य अवलंब करते. राज्याच्या सुरक्षिततेचा विचार करताना राज्याचे राजकीय डावपेच इतर देशांशी असलेले राजकीय संबंध, करार, लष्करी सामर्थ्य उभारणे व ते वाढविणे इत्यादी कार्यांचा यात समावेश होतो. राजकीय भूगोलाच्या विविध दृष्टिकोनात कार्यात्मक दृष्टिकोनाला विशेष महत्त्व आहे.

**५.वर्तनात्मक दृष्टिकोन (Behavioral Approach) :**

वर्तनात्मक राजकीय भूगोल (Behavioral Political Geography) हे स्वतंत्ररीत्या भिन्न असलेल्या राज्यांच्या (देशाच्या) वर्तनक्रियेच्या अभ्यासाशी संबंधित आहे. कॅसपरेन व मिघी या शास्त्रज्ञानी क्षेत्रीय वर्तन (Behavior in space) व त्याचे क्षेत्रीय स्वरूप (Spatial Pattern) या संबंधी पुढील विधान केले आहे ते म्हणतात, एका राज्याचे वर्तन दुसऱ्याशी सलोख्याचे असते, तर दुसऱ्याचे वर्तन राज्य बळकावण्याचे असते, म्हणून पहिल्याला बचावाचे वर्तन करावे लागते. जसे भारताचे वर्तन पाकिस्तान व चीन विषयी स्नेहाचे आहे, मात्र दोघाचे भारताविषयीचे वर्तन हे आक्रमतेचे आहे. राज्याची वर्तनात्मक पद्धती (Behavioral method) अनुभव व प्रयोगावर आधारित असते. राजकीय भूगोलात वर्तनात्मक दृष्टिकोन कायदे मंडळाच्या मतदान प्रक्रियेच्या क्षेत्रीय वर्तनाशीही संबंधित आहे. यात प्रत्येक मतदार संघाचे स्थान, तेथील उमेदवार, मतदार, मतदान प्रक्रियेशी संबंधित कर्मचारी वर्ग आणि एकूण मतदान प्रक्रियेचा समावेश होतो तसेच, यात पूर्वीची उमेदवारांच्या पेटचात चिठ्ठया (मते) टाकण्याची पद्धत व नंतर आलेली उमेदवाराच्या चिन्हांवर शिक्के मारण्याची पद्धत आणि आता आलेली इलेक्ट्रॉनिक पद्धत यांचाही अंतर्भाव आहे. या सर्व क्रिया म्हणजे एक प्रकारे वर्तन आहे ज्यांचा अभ्यासही राजकीय भूगोलात होतो.

**६.रचनात्मक दृष्टिकोन (The Systematic Approach) :**

राजकीय भूगोलात रचनात्मक दृष्टिकोन सामान्य-सैद्धांतिक (General System Theory) रचनेतून आला आहे सामान्य रचना सिद्धांत हा एकमेकांशी संबंधित असलेल्या गोष्टीवर प्रकाश टाकतो. हे याचे सार आहे यात विषयाच्या आराखड्याच्या ऐक्यावर भर दिला जातो. राजकीय प्रक्रिया ह्या भौगोलिक क्षेत्रांतर्गत असतात भौगोलिक स्थितीचा तेथील राजकीय प्रक्रियेवर प्रभाव पडतो त्या संदर्भातून भूराज्यशास्त्र (Geopolitical System) पद्धती पुढे आली आहे.

राजकीय घडामोडी व सामाजिक रचना हे जागा (Place), क्षेत्र (Area) व भूचित्र (Landscape) या भौगोलिक क्षेत्राचे घटक आहेत. या भौगोलिक क्षेत्राच्या राजकीय क्रियेतून विविध संघटना निर्माण होतात, ज्या रचनाबद्ध असतात जसे. भारतात पंचायत राज्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि शासकीय प्रशासनात तालुका, जिल्हा, आयुक्त विभाग राज्य (प्रात) आणि देश असा चढता स्तर असतो अशी रचना असते. यांचा राजकीय भूगोलात रचनात्मक दृष्टीने अभ्यास होतो

**७.वास्तव दृष्टिकोन (Factual Approach) :**

**बाऊमन** या शास्त्रज्ञाने या दृष्टिकोनाची कल्पना मांडली. बाऊमनच्या मते, राज्यातील (देश) निरनिराळ्या गोष्टी समजून घेण्यासाठी राजकीय भूगोलाच्या अध्ययनात तेथे प्रत्यक्ष असलेल्या स्थितीचा विचार केला जातो.

**८.सांख्यिकी दृष्टिकोन (Statistical Approach) :**

अलीकडे सर्व विषयांत गुणात्मक पद्धतीबरोबर संख्यात्मक पद्धतीला महत्त्व प्राप्त झाले आहे. राजकीय भूगोल त्याला अपवाद नाही. राज्यातील विविध घटक, त्यांची संख्या, मतदार उमेदवार वगैरेंच्या संदर्भात आकड्यांना महत्त्व आहे.

राजकीय भूगोलात असलेले वरील दृष्टिकोन वेगवेगळे असले, तरी ते अभ्यासाच्या दृष्टीने स्वतंत्र व परिपूर्ण नाहीत कारण, प्रत्येक दृष्टिकोनात काही चांगल्या गोष्टी असल्या, तरी त्यात काही त्रुटीही आहेत, म्हणून वरील दृष्टिकोनातून राजकीय भूगोलाचा अभ्यास संतुलितपणे होत नाही. म्हणून काही शास्त्रज्ञांनी एकात्मिक दृष्टिकोनाची (Integrated Approach) कल्पना मांडली. या दृष्टिकोनानुसार राजकीय भूगोलाचे अध्ययन एकत्रित केल्यास त्यातून चांगले निष्कर्ष निघू शकतात.अशा प्रकारे कालावधीनुसार राजकीय भूगोलाच्या अभ्यासाचा दृष्टीकोन बदलत असल्याचा दिसून येतो.

## 1.4 राजकीय भूगोलाचे महत्त्व /फायदे (Significance of Political Geography)

राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची एक शाखा आहे. या विषयाचा अभ्यास अनेक वर्षापासून होत असून याचे महत्त्व वेगवेगळ्या प्रकारे सांगता येईल.

१) लोक, राज्य व प्रदेश यांचे परस्पर संबंध समजून घेण्यास राजकीय भूगोलाकडे पाहिले जाते.

२) देशा देशातील सीमा, सरहद्दी यांचा अभ्यास राजकीय भूगोलांतर्गत होतो.

३) राज्य संबंध तसेच सामाजिक परिवर्तन (Social Transformation) यांचा अभ्यास राजकीय भूगोलात होतो.

४) देशा देशातील संबंध (आंतरराष्ट्रीय संबंध) हे राजकीय स्थितीवर अवलंबून असतात हे राजकीय भूगोलाच्या अध्ययनाने स्पष्ट होते.

५) देशातील विविध राजकीय घटकांच्या (Political Units) संबंधांचा अभ्यास राजकीय भूगोलाशी निगडित आहे.

६) विदेशी व्यापार व व्यापारी धोरण हे राजकीय स्थितीवर अवलंबून असते.

७) महत्त्वाचे म्हणजे लष्करी डावपेच व विदेशी धोरण हे राजकीय भूगोलाचे महत्त्वाचे विषय आहेत.

अशाप्रकारे राजकीय भूगोल हा महत्त्वाचा विषय आहे.

## विभाग पहिला: राजकीय भूगोलाचा परिचय

**प्र. 1) खालील प्रश्नांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१.राजकीय भूगोल कोणत्या भूगोलाची शाखा (उपशाखा) आहे

**अ) मानवी भूगोल** ब) आर्थिक भूगोल क) प्राकृतिक भूगोल ड) यापैकी नाही

२.राजकीय भूगोलाचे जनक कोणास म्हटले जाते

अ) व्हिटलेसी ब) हार्टशोन क) कार्ल सावर **ड) रॅटझेल**

३.राजकीय दृष्ट्या संघटित झालेला प्रदेश, त्यांची साधनसंपत्ती व विस्तार यांचा अभ्यास कोणत्या भूगोल शाखेत केला जातो

**अ) राजकीय भूगोल** ब) लोकसंख्या भूगोल क) वाहतूक भूगोल ड) यापैकी नाही

४.खालीलपैकी कोणता राजकीय भूगोलाचा स्थिर घटक नाही

अ भूरचना ब) हवामान क) जलाशय **ड) लोकसंख्या**

५.खालीलपैकी कोणता राजकीय भूगोलाचा अस्थिर घटक नाही

अ खनिज संपत्ती ब) नवीन देशाची निर्मिती **क) भूरचना** ड) लोकसंख्या

६. Anthropogeography हा ग्रंथ कोणी लिहिला

**अ) रॅटझेल** ब) हार्टशोन क) कार्ल सावर ड) हम्बोल्ट

७.आदर्श राज्याची संकल्पना कोणी सांगितली

अ) स्ट्राबो ब) जॅक्सन **क) अरिस्टॉटल** ड) हम्बोल्ट

८. ऑरिस्टॉटल हा कोण होता.

**अ) ग्रीक** ब) रोमन क) अरब ड) भारतीय

९. पर्यावरण निश्चयवादाची विचारसरणी कोणत्या शास्त्रज्ञाने मांडली.

अ) ऑरिस्टॉटल ब) ब्लाश **क) रॅटझेल** ड) टेलर

१०. कोणत्या साम्राज्याच्या ऱ्हासानंतर युरोपमध्ये भौगोलिक अध्ययनाच्या अंधकार युगास सुरुवात झाली.

अ) ग्रीक ब) अरब क) ब्रिटिश **ड) रोमन**

११. कोणत्या शास्त्रज्ञांनी राजकीय भूगोलाचे चार दृष्टिकोन सांगितले आहेत.

**अ) व्हिटलेसी** ब) हार्टशोन क) फेबवरे ड) रॅटझेल

१२. कोणत्या शास्त्रज्ञाने The earth and state या ग्रंथात नॅशनल स्टेटच्या संदर्भात विवेचन केले आहे.

अ) हार्टशोन ब) स्पाईकमन **क) व्हिटलेसी** ड) मॅकिंडर

१३.  कार्यात्मक दृष्टिकोनाची संकल्पना कोणी मांडली.
अ) मॅकिंडर    ब) रॅटझेल    क) व्हिटलेसी    **ड) हार्टशोन**

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी दिलेल्या Question Bank मधील प्रश्न

**प्र. 1) खालील प्रश्नांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

1. खालील पैकी कोणती मानवी भूगोलाची उपशाखा आहे?
   अ) मृदा भूगोल ब प्राकृतिक भूगोल (**कराजकीय भूगोल (** ड यापैकी नाही (
2. राजकीय भूगोलातील वास्तव दृष्टिकोनाची कल्पना कोणी मांडली "
   **अ) बाऊमन** ब ब्रॉन (रॅटझेल ड (स्ट्रेबो क (
3. आदर्श राज्याची संकल्पना कोणी मांडली?
   अ स्पाइकमन (मॅकिंडर ब (**कॲरिस्टॉटल (** ड ब्लाश (
4. खालीलपैकी कोणता घटक राजकीय भूगोलात अभ्यासला जात नाही?
   अ) लोकसंख्या ब साधनसंपत्ती (**कजात (** डविदेशी व्यापार (
5. राजकीय भूगोलातील कार्यात्मक दृष्टिकोनाची संकल्पना कोणी मांडली?
   **अ) हार्टशोन** ब जॅकसन (पाऊंडस ड (फिट्झर्लंड क (
6. राजकीय भूगोलाचा वैश्विक नमुना कोणी मांडला?
   अ) हार्टशोन **ब) मॉन्टेस्क्यु** क) पाऊंडस ड) जॅकसन

**प्र. 2) टिपा लिहा.**

१) राजकीय भूगोलाचे स्वरूप

२) राजकीय भूगोलाची व्याप्ती

३) राजकीय भूगोलातील ऐतिहासिक दृष्टीकोण

४) राजकीय भूगोलातील वर्तनात्मक दृष्टीकोण

५) राजकीय भूगोलाचे महत्व

**प्रश्न प्र. 3) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) राजकीय भूगोलाच्या व्याख्या सांगून स्वरूप स्पष्ट करा.

२) राजकीय भूगोलाच्या व्याख्या सांगून व्याप्ती स्पष्ट करा

३) राजकीय भूगोलाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा

४) राजकीय भूगोलाच्या व्याख्या सांगून त्याच्या अभ्यासाचे दृष्टिकोन स्पष्ट करा

५) राजकीय भूगोलाच्या व्याख्या सांगून महत्व स्पष्ट करा.

## संदर्भ ग्रंथ/ Reference book


1. एभूगोलाची मुलतत्वे :कोळेकर .एस .सवदी व पी .बी ., निराली प्रकाशन, पुणे
2. प्रा.एस. व्ही. ढाके व डॉ. व्ही. जे. पाटील: राजकीय भूगोल, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
3. प्रा. के. ए. खतीब: राजकीय भूगोल, मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर
4. भागवत अ.वि. : राजकीय भूगोल, नरेंद्र प्रकाशन, पुणे
5. डॉ. घारपुरे विठ्ठल: राजकीय भूगोल, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर
6. डॉ. मगर, जयकुमार: राजकीय भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर